# औरंगाबाद जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्राचे व्यवस्थापन

**अनुराधा संजय भारद्वाज**
संशोधक विद्यार्थीनी
banuradha42@gmail.com
Mob. 9404506328

**सारांश :**

महाराष्ट्रातील बहुतांश शेती ही मान्सूनच्या पावसावर अबलंबून असते आणि हा पाऊस अनियमित आणि अनिश्‍चित स्वरूपाचा असतो. पिण्यासाठी, शेतीसाठी व ग्रामीण विकासासाठी निश्‍चित स्वरूपाचा पाणीपुरवठा होण्यासाठी पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन पद्धती अत्यंत महत्त्वाची आहे. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून कोरडवाहू शेतीचा विकास होऊ शकतो.

**प्रस्तावना :**

सातत्याने कोसळणाऱ्या पावसामुळे गेल्या काही दिवसात महाराष्ट्रात सर्व पूरस्थिती आहे. मात्र वाहून जाणार हे पाणी साठवायचं किंवा त्याचे व्यवस्थापन कसे करायचे याची कोणतीच उपाययोजना आपल्याकडे नाही. महाराष्ट्रात आत्तापर्यंत साडेतीन हजारांवर लहान मोठी धरणे १३५० अ.घ.फू. पाणी साठे निर्माण केले असले तरी ती पूर्ण राज्याचीच काय त्या - त्या भागातील पाणीटंचाईही दूर होऊ शकली नाही. महाराष्ट्राची शेती ही ७५ ते ८४ टक्के पावसावर अवलंबून आहे. पावसाचे प्रमाण हे अनियमित असल्यामुळे पीक उत्पादन हे निश्‍चित स्वरूपाचे राहिलेले नाही. त्यामुळे पिकांची उत्पादकता अतिशय कमी असून त्यात नेहमीच अस्थिरता आढळून येते. कोरडवाहू शेतीच्या उत्पादनात स्थैर्य आणण्यासाठी पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम हा एकमेव पर्याय आहे.

सन १९८२ साली सर्वकष पाणलोट क्षेत्र विकास ही योजना आस्तित्वात आली. सर्वसाधरणपणे या योजनेचा उ÷श पडलेल्या पावसाचे पाणी ज्या ठिकाणी पडेल त्याच ठिकाणी ते थांबविले व जिरविले पाहिजे असा आहे. पाणी हे शेती उत्पादानाचा एक अविभाज्य घटक आहे. पावसाच्या पाण्याचे नियोजन करण्यास बराच वाव आहे. म्हणून हे पाणी जमीनीवरून वाहून न जाऊ देता ते त्याच क्षेत्रामध्ये अडवून जमिनीमध्ये जास्तीत जास्त जिरविले पाहिजे. पावसाचे वाहून जाणारे पाणी मोठमोठ्या धरणांत जमा झाले, तर त्याची मालकी व कालव्यांमार्फत वितरणाची व्यवस्था ही सरकारकडे असते. भुजलात जमा होणाऱ्या पाण्याची मालकी ही शेतकऱ्याकडे म्हणजेच जमिनीच्या मालकाकडे असते. उपलब्ध पाण्यापैकी ७० टक्के पाणी शेतीसाठी, २० टक्के पाणी उद्योगांसाठी व दहा टक्के पाणी पिण्यासाठी कायमस्वरूपी मिळावे, म्हणून पाणलोट क्षेत्रात पडणाऱ्या पावसाचे व्यवस्थापन हे महत्वाचे ठरते.

**संज्ञा :** पाणलोट क्षेत्र, कृषी, व्यवसाय, लोकसंख्या

**संशोधनाची उद्‌दिष्टे :**

१. औरंगाबाद जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्र विकासाचा आढावा घेणे.

२. औरंगाबाद जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून कोरडवाहू शेतीचा विकास करणे.

३. औरंगाबाद जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्ती, पूर, अवर्षण, भूमिपात इत्यादींना आळा घालणे.

४. औरंगाबाद जिल्ह्यातील शेतीवर आधारित कृषी उद्योगांत वाढ करणे.

५. औरंगाबाद जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाद्वारे आर्थिक विकासातून ग्रामीण विकास करणे.

**अभ्यास क्षेत्र :**

औरंगाबाद जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १०,१०० चौ.कि.मी. आहे. हा जिल्हा १९० ते २०० उत्तर अक्षांश आणि ७४० ते ७६० रेखांशमध्ये पसरलेला आहे. जिल्ह्याची पूर्व-पश्चिम लांबी २०१ कि.मी. व उत्तर - दक्षिण लांबी १६१ कि.मी. आहे. प्रशासकीय दृष्टीने औरंगाबाद जिल्ह्याचे औरंगाबाद, वैजापूर , सिल्लोड, पैठण, कन्नड हे पाच विभाग असून एकूण ९ तालुके, १३५६ गावे ८५६ ग्रामपंचायती आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील मुख्य गोदावरी नदी असून पूर्णा, शिवना, खाम, दुधना, गिरजा, सुखना, मार्तंडेय ह्या नद्या गोदावरीच्या उपनद्या आहेत. जिल्हा अवर्षणप्रवण क्षेत्रात येतो. जेथे अपुरा पाऊस, अनिश्चित आणि अपेक्षेने प्रभावित न करणारा आहे. ज्याचा या भागावर सामाजिक, आर्थिक विकासावर प्रचंड परिणाम होतो.

औरंगाबाद जिल्ह्यात २०११ च्या जनगणने-नुसार एकूण लोकसंख्या ३७,०१,२८२ आहे. अभ्यास क्षेत्रातील पाण्याची उपलब्धता विषम आहे. जिल्ह्यातील मोठा भू-भाग हा अवर्षण प्रवण आहे. तर काही अल्प भू-भागावर पाण्याची विपूल उपलब्धता आहे. वातावरणातील बदलाच्या संभाव्य धोक्याच्या पार्श्वभूमीवर परिस्थिती अधिकच बिकट होणार आहे. त्यामुळे कोरडवाहू शेतीच्या उत्पादनात स्थैर्य आणण्यासाठी पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम हा एकमेव पर्याय आहे. पाणलोट क्षेत्र निवडल्यामुळे मृदासंधारण व जलसंधारणाची सर्व कामे या क्षेत्रावर केली जातात. ही सर्व कामे एकमेकांना पुरक असल्यामुळे त्यांचा एकत्रित परिणाम निश्चितच चांगला दिसून येईल.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीयक माहिती स्त्रोतांचा वापर केला जाणार आहे. तसेच साप्ताहिक, मासिके, नियतकालिऐ, इंटरनेट, इ. माध्यमातून आधार घेतला जाणार आहे.

**अभ्यास विषय :**

सदर संशोधनासाठी औरंगाबाद जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्राचे व्यवस्थापन हा विषय निवडला आहे. यामध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्राच्या सद्य स्थितीचा अभ्यास केलेला आहे. तसेच यामध्ये पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमा अंतर्गत संदर्भ वर्षातील पूर्ण झालेल्या पाणलोटांचा पाच वर्षाच्या स्थितीचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मृदा व जलसंधारण कामांची प्रगती**

| जिल्हा औरंगाबाद | | संदर्भ वर्ष- २०१९-२० | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | तालुका | पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांर्गत | | | संदर्भ वर्षात प्रत्यक्ष सुरू झालेली कामे | | | संदर्भ वर्षात पूर्ण झालेले पाणलोट | | | | |
| | | निवडलेली गावे | पाणलोटांची संख्या | पाणलोटांचे एकुण क्षेत्र (हे.) | गावांची संख्या | पाणलोटांची एकूण संख्या | पाणलोटांचे एकुण क्षेत्र (हे.) | पुर्ण झालेल्या पाणलोटांची संख्या | पूर्ण पाणलोटांचे क्षेत्र (हे.) | झालेला खर्च (रू. लाखात) | पुर्ण विकसित झालेली गावे (संख्या) |
| १ | कन्नड | ६५ | ४५ | २९६६९ | ३८ | ६१ | ८८१५ | ० | १०२० | २०१.३३ | ० |
| २ | सोयगांव | ५२ | ५२ | ३०४९७ | १२ | १९ | २९५२ | ० | २५५ | २८.५५ | ० |
| ३ | सिल्लोड | ९९ | ९६ | ४३८४७ | ३३ | ५२ | ९७५५ | ० | ५१० | २७७.२६ | ० |
| ४ | फुलंब्री | २७ | २७ | ९३३५ | १८ | २६ | २८२५ | ० | २५५ | ६४.१३ | ० |
| ५ | औरंगाबाद | ११३ | ६५ | ३३०५४ | ४९ | ५८ | ७५५९ | ० | १८२२ | १४५.८४ | ० |
| ६ | खुलताबाद | ८० | ८५ | ३६६०६ | १९ | २४ | ३२२१ | ० | २५५ | ५०.२ | ० |
| ७ | वैजापूर | ४८ | ११२ | ३४०३९ | २९ | ३३ | ६९५२ | ० | ३८० | ३२९.९४ | ० |
| ८ | गंगापूर | ५५ | ५४ | २९१९० | ४२ | ५८ | ९२५१ | ० | १०२० | ६६२.६३ | ० |
| ९ | पैठण | ७३ | ७३ | १२६९१ | ४४ | ५१ | ८५१९ | ० | ९०० | ३९७.७७ | ० |
| एकुण | जिल्हा | ६१२ | ६१९ | २५९०२८ | २८४ | ३८२ | ५९८७९ | ० | ६४१७ | २९५७.६६ | ० |

**स्त्रोत :** जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, औरंगाबाद

सन २०१९-२० मध्ये पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाअंतर्गत औरंगाबाद जिल्ह्यातील निवडलेल्या गांवाची संख्या ६१२ असून पूर्ण विकसित झालेल्या गावांची संख्या ०० आहे. तसेच संदर्भ वर्षात प्रत्यक्ष सुरू झालेल्या गावांची संख्या २८४ आहे. आणि त्यासाठी झालेला खर्च हा २१५७.६६ (लाखात) आहे.

यावरून एक बाब निरिक्षणात येते ती म्हणजेच निवडलेली गावे ६१२ आहेत आणि संदर्भ वर्षातील कामे प्रत्यक्ष सूरू झालेली गावांची संख्या २८४ आहे. यामध्ये खूप मोठी तफावत आढळून येते.

**जिल्ह्यातील पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमा अंतर्गत**

**मृदा व जलसंधारण कामांची प्रगती.**

| जिल्हा औरंगाबाद | | संदर्भ कालावधी २०१४-१५ ते २०१९-२० संदर्भ वर्ष २०१९-२० | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | संदर्भ वर्षात पूर्ण झालेले पाणलोट | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० |
| १ | पुर्ण झालेल्या पाणलोटांची संख्या | २४ | ४८ | १३९ | ४४ | ० |
| २ | पुर्ण पाणलोटांचे क्षेत्र (हे.) | ४२९६ | ५४४८ | ६५४५६ | ५६१५ | ६४१७ |
| ३ | झालेला खर्च (रु लाखात) | २०५२.७१ | ३४९०.५६ | ३९६५.०० | १५५९.६२ | २९५७.६६ |
| ४ | पुर्ण विकसित झालेली गावे (संख्या) | १६४ | ६४ | १८२ | २५५ | ० |

**स्त्रोत -** जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, औरंगाबाद

वरिल आकडेवारीनुसार पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाअंतर्गत पूर्ण झालेल्या पाणलोटांची संख्या, पूर्ण पाणलोटांचे क्षेत्र, त्यासाठी झालेला खर्च आणि पूर्ण विकसित झालेल्या गावांची संख्या यांचे प्रमाण लक्षात येते.

सन २०१५-१६ मध्ये पूर्ण झालेल्या पाणलोटांची संख्या २४ आहे. तर २०१९-२० मध्ये पूर्ण झालेल्या पाणलोटांची संख्या ०० आहे. तसेच पूर्ण विकसित झालेल्या गावांची संख्या सन २०१५-१६ मध्ये १६४ गावे असून सन २०१९-२० मध्ये ०० आहेत. तसेच त्यासाठी लागणारा खर्च २०१५-१६ मध्ये ०० आहेत. तसेच त्यासाठी लागणारा खर्च २०१५-१६ साली २०५२.७१ (लाखात) आहे. तर सन २०१९-२० साली २१५७.६६ लाखात आहे.

**निष्कर्ष :**

वरील दोन्ही प्रकारच्या तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांची संख्या कमी होत आहे. तसेच योजनेची अंमलबजावणी शासनाच्या विविध विभागांकडून होत असल्यामुळे पाणलोट विषयक कामांचे एकत्रीकरण व त्यांची नोंददेखील होत नाही. परिणामी पुढील व्यवस्थापनासाठी ही कामे सोपवता येत नाही. त्यामुळे पाणलोट विषयक कामे केली जाऊनही त्यांचा परिणाम दिसत नाही. शिवाय अनेक विभागांनी मिळून अंमलबजावणी करण्याच्या पद्धतीमुळे अनावश्यक खर्च होतो. या कामांचे एकत्रीकरण हे कोणत्याच एका विभागाकडे होत नसल्यामुळे कामे पूर्ण होण्याची व त्यांच्या गुणवत्तेची जबाबदारी कोणाकडेच राहत नाही.

हे सर्व मुद्दे लक्षात घेता पाणलोट क्षेत्राची अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी ही एका स्वतंत्र विभागाकडे सोपवणे गरजेचे आहे. हे काम मुख्यत: ‘पाणलोट क्षेत्र‘ विकासाचे असल्याने सध्या अस्तित्वात असलेल्या ‘जलसंधारण‘ या विभागाकडे योजनेची संपूर्ण जबाबदारी सोपवावी.

**संदर्भ ग्रंथ :**

१. डॉ. एस.व्ही. ढमढेरे - भारतीय जलसंपदा

२. प्रा.एच.के. डोईफोडे - भारताचा भूगोल

३. डॉ. विजया साळुंके - कृषी भूगोल

४. सिंचन स्थिती दर्शक अहवाल - २०१८-१९

५. औरंगाबाद जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन - २०१५-२०२०

६. मराठी विश्वकोष

७. कृषी महाराष्ट्र gov.in

८. विकासपिडीया

9. सकाळ वृत्तपत्र

10. वनराई - विशेषांक